# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**द्वितीय वर्ष, चतुर्थ सत्र**

**२०२३-२४**

**आंतरवासिता गट क्रमांक - ०१**

**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे**

**चांगु काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल**

**मार्गदर्शिका : प्रा. बिजली दडपे**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल. यांच्या बी.एड व्दितीय वर्ष,चतुर्थ सत्रातील आंतरवासिता गट क्रमांक-०१ या गटाचा तृतीय आंतरवासिता उपक्रम जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगु काना ठाकूर विद्यालय,नवीन पनवेल येथे पार पडला.मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रम निकषानुसार २२ फेब्रुवारी २०२४ ते ३० मार्च २०२४ या कालावधीत ०५ आठवड्याचा आंतरवासिता कार्यकाल पूर्ण करण्यात आला. या कार्यकालात प्रा.बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरवासिता गट क्रमांक ०१ मध्ये एकूण ९ छात्र अध्यापकांचा समावेश होता.

**आंतरवासिता गट क्रमांक ०१ मधील छात्राध्यापकांची नावे खालील प्रमाणे**

| क्र. | हजेरी क्रमांक | छात्राध्यापकाचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| १ | ०१ | भावना शिवराम भगत | भूगोल |
| २ | ०६ | सुरज रवींद्र बुंधे | विज्ञान |
| ३ | ०८ | विपुल विलास धापशी | विज्ञान |
| ४ | १० | ज्योती अशोक डोंबरे | इतिहास |
| ५ | २४ | सुरज शंकर म्हस्कर | मराठी |
| ६ | २७ | प्रेमा दिनेश पडवळे | भूगोल |

| | | | |
|---|---|---|---|
| **७** | **३१** | **प्रतिक उत्तम पवार** | **इतिहास** |
| **८** | **३६** | **सुस्मिता शंकर रणपिसे** | **विज्ञान** |
| **९** | **३९** | **प्रज्ञा धनंजय साळुंखे** | **गणित** |

## उद्दिष्टे

१) शालेय कामकाजाची ओळख व प्रत्यक्ष कृती करणे.

२) प्रत्यक्ष शिकवण्याची कृती व पद्धतींचा अभ्यास करणे.

३)वर्ग नियंत्रण,शालेय नियोजन,वेळापत्रक,सहशालेय उपक्रम यांची ओळख करून देणे.

४) गट नियोजन, व्यवस्थापन करणे.

५) सहाध्यायी प्रशिक्षणार्थी सोबत कोटीचिंगचे पाठ घेण्याचा अनुभव प्राप्त करणे.

६) शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांची समस्या समजून घेऊन त्या समस्येवर उपाययोजना करणे.

७) निवडलेल्या समस्येवर उपाययोजना करून कृतीसंशोधन सादर करणे.

## प्रमूख

शालेय रचनेनुसार प्रशिक्षणार्थी यांना विविध पदे व जबाबदाऱ्या देण्यात आल्या.मार्गदर्शिका प्रा.बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाने आंतरवासितेतील निकषानुसार खालील प्रशिक्षणार्थी यांना जबाबदारी व पदे देण्यात आली..

| ह क्र | **प्रशिक्षणार्थीचे नाव** | **प्रमुख**पद |
|---|---|---|
| **३१** | **प्रतिक उत्तम पवार** | **मुख्याध्यापक** |
| **३९** | **प्रज्ञा धनंजय साळुंखे** | **उपमुख्याध्यापक** |

| | | |
|---|---|---|
| १ | भावना शिवराम भगत | पर्यवेक्षक |
| ८ | विपुल विलास धापशी | वेळापत्रक प्रमुख |
| १० | ज्योती अशोक डोंबरे | हजेरी प्रमुख |
| २७ | प्रेमा दिनेश पडवळे | खजिनदार,अहवाल प्रमुख |
| २४ | सुरज शंकर म्हस्कर | समाजसेवा प्रमुख |
| ६ | सुरज रवींद्र बुंधे | ICT प्रमुख |
| ३६ | सुस्मिता शंकर रणपिसे | कृती संशोधन प्रमुख |

- **आंतरवासिता उपक्रमातील महत्वाच्या कृती.**

## १) सराव पाठ

आंतरवासिता उपक्रमातील दिवाळी सुट्टी नंतरच्या अर्थातच चौथ्या आठवड्यापासून शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या प्रत्यक्ष सराव पाठाला सुरुवात झाली. दि.२२ फेब्रुवारी २०२४ ते १३ मार्च २०२४ या दरम्यान एकूण ४५ सराव पाठ पूर्ण केले.

## २) सहाध्यायी सोबत पाठ ( Co Teaching Lesson)

आपल्या विषयाच्या सहाध्यायी प्रशिक्षणार्थीच्या अध्यापन तंत्राचा वापर करत आपल्या गटातील प्रशिक्षणार्थी सोबत प्रत्येकी ५ सहाध्यायी पाठ घेणे आवश्यक होते.आणि हे एकूण ४५ पाठ दिनांक १ मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ या यशस्वीपणे पूर्ण केले.

## ३) कृतीसंशोधन

मुंबई विद्यापीठाच्या द्वितीय वर्षातील चतुर्थ सत्राच्या बी.एड आंतरवासिता अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींनी शालेय स्तरावर एका वर्गाची निवड करून त्या वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक समस्या समजून घेऊन ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करणे व त्याचा अहवाल सादर करणे अर्थातच कृती संशोधन करणे गरजेचे होते. त्या अन्वये गट क्रमांक १ च्या प्रशिक्षणार्थींनी खालील प्रमाणे वर्गाची निवड करून तेथील समस्या जाणून घेऊन कृती संशोधनाचे कार्य पूर्ण केले.

१)संशोधकांचे नाव : प्रतिक उत्तम पवार

समस्येचे शीर्षक : इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत व स्वाध्यायात स्वमताची उत्तरे लिहिण्यास येणारे अडथळे यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

इयत्ता : नववी अ

२)संशोधकाचे नाव- प्रज्ञा धनंजय साळुंखे

कृती संशोधन समस्येचे शीर्षक- इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील विविध मूलभूत संकल्पना व वैज्ञानिक संज्ञा समजण्यास येणाऱ्या अडचणीचा शोध घेणे व त्यावरील उपाय योजनांच्या परिणामकारकतेचा याचा अभ्यास करणे.

इयत्ता 8/अ

३)संशोधकाचे नाव - भावना शिवराम भगत.

सी. के.टी विद्यालय नवीन पनवेल येथील इयत्ता सातवी ' ब ' च्या विद्यार्थ्यांना विरामचिन्हांचे लेखन करण्यात येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे व त्यावरील कृती कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

वर्ग - इयत्ता 7 वी ब

४)संशोधकाचे नाव- सुरज रविंद्र बुंधे

कृती संशोधन समस्येचे शीर्षक- इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील बेरजेचे नियम समजण्यास येणाऱ्या अडचणींवर मात करून त्यावर उपाययोजना करणे.

इयत्ता-6/ब

५)संशोधकाचे नाव - ज्योती अशोक डोंबरे

कृती संशोधन समस्येचे शीर्षक - इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी शुद्धलेखन करताना येणाऱ्या अडचणीचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना करणे

इयत्ता : ६ अ

६)संशोधकाचे नाव : प्रेमा दिनेश पडवल

कृती संशोधन समस्येचे शीर्षक : इयत्ता सहावी अ च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

इयत्ता 6 (अ)

७)संशोधकाचे नाव : सुश्मिता शंकर रणपिसे

कृतीसंशोधन समस्येचे शीर्षक: इ.६वी च्या विद्यार्थ्यांना गणित विषयांतील शाब्दिक उदाहरणे सोडविताना येणाऱ्या समस्यांया शोध घेणे व त्यावर उपाययोजन करणे.

इयत्ता :- सहावी (ब)

८)संशोधकाचे नाव-सुरज शंकर म्हस्कर

कृती संशोधन समस्येचे शीर्षक- इयत्ता

६ वी अ च्या हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना मराठी वाचना मध्ये येणाऱ्या अडचणी.

इयत्ता : ६ अ

९)संशोधकाचे नाव : विपुल विलास धापशी

कृतीसंशोधन समस्येचे शीर्षक - इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील भौमितिक आकारांच्या आकलनात येणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना करणे..

इयत्ता : ७ अ

◈ **विशेष शाळा भेट उपक्रम :**

मुंबई विद्यापीठाच्या द्वितीय वर्षातील चतुर्थ सत्राच्या बी.एड आंतरवासिता अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींनी एका विशेष शाळेला भेट देणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी गट मार्गदर्शिका प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली सी.के. ठाकूर विद्यालय गट क्रमांक १ यांनी मु.पो. पिंपळभाट, ता.अलिबाग, जि.रायगड येथील ' राष्ट्रमाता जिजाऊ मतिमंद मुलांची शाळा' या विशेष शाळेला दिनांक १२ मार्च २०२४ रोजी एकदिवसीय अभ्यास भेट दिली.

**विशेष शाळा भेटीमागील उद्दिष्टे**

१) एक दिवशी अभ्यास भेटीचे नियोजन करणे

२) प्रत्यक्ष शाळा भेटीतून शाळेचे कामकाज, नियोजन व व्यवस्थापन याची माहिती घेणे.

३) विशेष शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या समस्यांविषयी जाणून घेणे.

४) शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांच्या तंत्रांविषयी, शिकवण्याच्या पद्धतीविषयी जाणून घेणे.

५) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शाळा चालविणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहित करणे.

## ◈ समाजसेवा उपक्रम

मुंबई विद्यापीठाच्या बी. एड चतुर्थ क्षेत्रातील आंतरवासिता अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणार्थींनी शालेय स्तरावर समाजसेवा उपक्रम राबविणे गरजेचे आहे. आणि त्या अन्वये सी.के.ठाकूर विद्यालयातील प्रशिक्षणार्थींनी शाळेचे पर्यवेक्षक श्री. कैलास म्हात्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची पाहणी केली. आणि दिनांक २३ मार्च २०२४ ते ३० मार्च २०२४ शाळेच्या गरजेनुसार शालेय क्रीडांगणातील लांब उडी पटाजवळील वाढलेले गवत काढून तो परिसर संपूर्णपणे स्वच्छ करून गट मार्गदर्शिका प्रा. मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवेचा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.

## ◈ रिक्त तासिका

रजेवर असणाऱ्या शिक्षणाच्या जागी जाऊन बुलेटिन अर्थातच रिक्त तासिका सांभाळण्याचे कार्यही आमच्या गटाने पूर्ण केले.ज्यात विविध गोष्टी,गाणी,मागे राहिलेला अभ्यासक्रम या गोष्टी शिकविल्या. तसेच वर्ग नियंत्रणाची भूमिका सुद्धा यशस्वीपणे पूर्ण केली.

## ◈ सहशालेय उपक्रम

आंतरवासिता कार्यक्रमातील पाठांची सर्व मालिका पूर्ण करीत असतानाच विद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमातही आमच्या प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला.

१) मराठी राज्यभाषा गौरव दिन कार्यक्रम

२) दैनंदिन शालेय प्रार्थना

३) राष्ट्रीय विज्ञान दिवस

४) प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थींचा स्वागत सम◌ारंभ

यांसारख्या विविध उपक्रमांमधून शिक्षकांना मदत आणि सहभाग नोंदवला. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून एखादा कार्यक्रम कसा राबवावा? त्याचे आयोजन कसे करावे? या सर्वांचा अनुभव मिळाला.

## ◈ विशेष उपक्रम : विशेषांक प्रकाशन व माहिती प्रदर्शन

दिनांक १५ मार्च २०२४ रोजी महिला दिनाचे औचित्य साध◌ून शासकीय अध◌्यापक महाविद्यालय येथे गट क्रमांक १ यांच्या प्रशिक्षणार्थींनी गट मार्गदर्शिका प्रा. बिजली दडपे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील नऊ कर◌्तुत्वव◌ान स्त◌्रियांच्या माहितीचे प्रदर्शन भरवले. ज्यामध्ये आरोग्य, समाजसेवा, राजकारण, क◌्रीडा, शिक्षण इत्यादी क्षेत्रात नावलौकिक करून मानवतेप्रती सेवा देणाऱ्या कर◌्तुत्वान स्त◌्रियांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर या सर्व कर्तुत्वान महिला◌ंची " सुरुंग फोडिते" या शीर्षकांतर्गत विशेष अंकाच्या माध्यमातून संकलित करण्यात आली. सदर माहिती प्रदर्शनाचे उद◌्घाटन आणि विशेषांकाचे प्रकाशन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम, माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य धीरेंद्र ठाक◌ूर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि प्रथम व द◌्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## सहविचार सभा

आंतरवासिता कार्यकाळादरम्यान सर्व आठवड्यात दैनंदिन अभिप्राय घेत,पुढील नियोजन करण्यासाठी सहविचार सभा घेण्यात आल्या.दैनंदिन नियोजन,साप्ताहिक नियोजन,सहशालेय उपक्रम,वेळापत्रक नियोजन,पाठ टाचण संदर्भातील सूचना, ,सहाध्यायी पाठ, कृती संशोधन नियोजन व मार्गदर्शन यांसारख्या इतरही बाबींवर चर्चा करण्यात आली.या सर्व गट सभा गटमार्गदर्शिका प्रा.बिजली दडपे मॅडम यांच्या मार्गदर्शनाने पार पडल्या.

## आंतरवासिता सांगता समारोप

२२ फेब्रुवारी २०२४ ते ३० मार्च २०२४ या यादरम्यान झालेल्या आंतरवासिता कार्यकाळाचा समारोप समारंभ दिनांक २७ मार्च २०२४ रोजी विद्यालयाच्या दृक श्राव्य सभागृहात पार पडला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद गटमार्गदर्शिका प्रा. बिजली दडपे मॅडम यांनी भूषविले. तर शालेय शिक्षिका श्रीमती. शमिका मोरे मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटमुख्याध्यापक श्री. प्रतीक पवार यांनी केले.तर गट मार्गदर्शिका प्रा. बिजली दडपेबिजली दडपे मॅडम यांनी महाविद्यालय आणि गटासंदर्भात माहिती देऊन सर्वांना संबोधित केले. आदरणीय शमिका मोरे मॅडम यांनी आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणार्थींच्या कामाचे, अध्यापनाचे कौतुक करून आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थी सिद्धी मुसळे आणि द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी प्रेमा पडवळे यांनी आपले अनुभव कथन केले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भावना भगत यांनी केले तर श्रीमती. प्रज्ञा साळुंखे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

**या आंतरवासितेतून छात्र अध्यापक काय शिकले...?**

१) शिक्षकांची जबाबदारी व कर्तव्य समजण्यास मदत झाली.

२) बुलेटिन तासिकेदरम्यान वर्ग नियंत्रण,नाविन्यता यांचा विकास झाला .

३)उपस्थिती व हजेरी पत्रक (कॅटलॉग),आरोग्य आराखडा,वस्तू निर्लेखन नमुना यांचे ज्ञान झाले.

४) सहशालेय उपक्रम आयोजन,नियोजन करण्याचे प्रशिक्षण मिळाले.

५)अनुभवी तज्ज्ञ शिक्षकांच्या अध्यापनाची विविध तंत्र अनुभवण्यास मिळाली.

६) विद्यार्थ्यांसमोर उभे राहून अध्यापन करण्याचा आत्मविश्वास वृध्दींगत झाला.

७) विषयाधिष्ठित पाठाच्या माध्यमातून सर्वंकष ज्ञान आणि सामाजिक विषयांवर भाष्य करता आले.

८) शाळेतील अनुभवी शिक्षकांसोबत अध्यापनाची सुसंधी प्राप्त झाली.

९) वार्षिक क्रीडा स्पर्धा, वार्षिक स्नेहसंमेलन यांसारख्या उपक्रमांचे आयोजन आणि नियोजन कसे करावे? याची प्रचिती आली.

१०) शालेय व्यवस्थापन आणि विद्यार्थी उपयोगी उपक्रम राबवण्यासाठी प्रेरणा मिळाली.